**कोरोना** • तीन महिन्यांनंतर प्रथमच मनपाचे कोविड सेंटर सुरू, पहिला रुग्ण दाखल

# आकडा वाढतोय, धास्तीही वाढली, जबाबदारीत मात्र लक्षणीय घट...

**दिव्य मराठी विशेष**

## शहरात ६३६ अॅक्टिव्ह रुग्ण, होम क्वारंटाइनची संख्या समजेना, महिलांसाठी स्वतंत्र केंद्र

**दीपक कांबळे** | नगर

कोरोना नियंत्रणात आणण्यासाठी प्रशासकीय स्तरावर शर्थीचे प्रयत्न सुरू असताना अजूनही अनेक नागरिक नियमांची पायमल्ली करताना दिसून येत आहेत. नगर शहरात एकाच दिवसात १०७ नवे कोरोना बाधित आढळून आले आहेत. मनपाने तब्बल ३ महिन्यानंतर सुरू केलेल्या कोरोना केंद्रात पहिली महिला पहिला शुक्रवारी दाखल झाली. शहरात एकाच महिन्यात ९३८ नव्या रूग्णांची भर पडली आहे. त्यामुळे परिस्थिती पुन्हा पूर्वीसारखी होऊ नये यासाठी प्रत्येकालाच मास्क वापरून नियमांचे काटेकोर पालन करावे लागणार आहे.

कोरोनाचा पहिला रूग्ण १२ मार्च २०२० रोजी नगर शहरात आढळून आला होता. तेव्हापासूनच रूग्णसंख्येचा आलेख दिवसेंदिवस वाढत गेला. लॉकडाऊनच्या शांततेत जाणाऱ्या अॅम्ब्युलन्सचा सायरनही कर्णकर्कश होता. शर्थीचे प्रयत्न अन् संयमी नागरिक कोरोनाशी लढा देत असताना संख्या मात्र, नियंत्रणात येत नव्हती. अवघ्या दोन महिन्यात जुलै २०२० पर्यंत नगर शहरातील कोरोना बाधितांची संख्या तब्बल २ हजार १२९ वर पोहोचली. पुढील एक महिन्यात ही संख्या तिनपटीने वाढून सहा हजारांवर पोहोचली. तर सप्टेंबरमध्ये नगर शहरात उच्चांकी तब्बल ८ हजार ९४२ रूग्ण आढळून आले होते. त्यानंतर मात्र, रूग्णसंख्या कमी होत असल्याचे आकेडवारीवरून स्पष्ट होते.

नागरिकांनी दाखवलेला संयम व कोरोना योद्धा म्हणून रस्त्यावर उतरलेली आरोग्य यंत्रणा, पोलिसांच्या सतर्कतेमुळे कोरोना नियंत्रणात आणण्यात यश आले होते. त्यामुळे नोव्हेंबरअखेर रूग्ण नसल्याने मनपाने कोरोना केंद्र बंद केले होते. परंतु, जानेवारीपासून पुन्हा रुग्णवाढ झाल्याने मनपा सतर्क झाली आहे. तब्बल तीन महिन्यानंतर मनपाने पहिले कोरोना केंद्र सुरू केले. मनपाच्या जैन-पितळे महिला कोरोना केंद्रात पहिली महिला रूग्ण शुक्रवारी दुपारी दाखल झाली आहे. या केंद्राची ७० रूग्णांची क्षमता आहे. रुग्णसंख्या वाढीनुसार व आवश्यकतेनुसार केंद्रांची व खाटांची संख्या वाढवली जाणार आहे. सध्या नगर शहरात ६३६ रूग्ण उपचार घेत आहेत. पूर्वीसारखी भयावह स्थिती टाळायची असेल तर सतर्क नियम पाळावेच लागतील.



मनपाने महिलांसाठी स्वतंत्र कोविड सेंटर सुरू केले आहे. मनपाच्या जैन-पितळे महिला कोरोना केंद्रात शुक्रवारी पहिली महिला रूग्ण उपचारासाठी दाखल झाली. छाया : उदय जोशी.

### ९ हजार होम क्वारंटाइन

कोरोना रूग्णांच्या संपर्कात आलेले तसेच कोणतेही लक्षण नसलेले तब्बल ९ हजार ३६२ जणांना घरीच अलगीकरणात (होम क्वारंटाईन) ठेवण्यात आले आहेत. परंतु, हे नागरिक खरोखरच अलगीकरणात राहतात की राजरोसपणे फिरतात यावर सध्यातरी नियंत्रण ठेवण्यासाठी प्रसासनालाही कसरत करावी लागत आहे. कोरोना झपाट्याने वाढत असल्याने प्रत्येकानेच सतर्क होण्याची गरज आहे.

### ५ दिवसांत ४३८ नवे रुग्ण

नगर शहरात ग्रामीण भागाच्या तुलनेत झपाट्याने कोरोना बाधितांची संख्या वाढत असल्याचे आता स्पष्ट होत आहे. डिसेंबर २०२० पर्यंत घसरलेला कोरोनाचा आलेख पुन्हा वर जातानाचे चित्र आहे. फेब्रुवारी महिन्यात नगर शहरात ९२८ नवे रूग्ण तर १ ते ५ मार्च या कालावधीत ४३८ रूग्ण आढळले. त्यात शुक्रवारी एकाच दिवसांत आढळलेल्या १०७ रूग्णांचाही समावेश आहे.

### नियमांचे काटेकोर पालन करा

*"मनपाकडे शासकीय तंत्रनिकेतन, आनंद लॉन, नटराज व जैन पितळे हे केंद्र उपलब्ध आहेत. त्यापैकी महिलांसाठी स्वतंत्र जैन पितळे केंद्र सुरू करण्यात आले आहे. त्यात पहिला रूग्ण दाखल झाला आहे. या केंद्रात जेवणाची व्यवस्था घर घर लंगरसेवेतर्फे केली आहे. नागरिकांनी नियमांचे पालन करावे. बूथ हॉस्पिटलशी टायअप करण्याचीही प्रक्रिया सुरू आहे.''*

**डॉ. अनिल बोरगे**, आरोग्य अधिकारी, मनपा.

### महिनानिहाय रुग्णसंख्या

| रुग्णसंख्या | महिना |
|---|---|
| २१२९ | जुलै (२०२०) |
| ६३२१ | ऑगस्ट |
| ८९४२ | सप्टेंबर |
| २२२३ | ऑक्टोबर |
| ९८४ | नोव्हेंबर |
| ९०६ | डिसेंबर |
| ४१२ | जानेवारी (२०२१) |
| ९३८ | फेब्रुवारी |
| ४३८ | १ ते ५ मार्च |

लोकमत

# प्राथमिक आरोग्य केंद्रांतही सुरू होणार लसीकरण

## आठवड्यातून तीन दिवस कामकाज

लोकमत न्यूज नेटवर्क

**अहमदनगर :** कोरोना लसीकरणाची व्याप्ती हळूहळू वाढत असून, आता जिल्ह्यातील ९६ प्राथमिक आरोग्य केंद्रांतही सोमवारपासून लसीकरण सुरू होणार आहे. सध्या २२ शासकीय व ३२ खासगी रुग्णालयात लसीकरण सुरू आहे. त्यात आता ९६ प्राथमिक आरोग्य केंद्रांची भर पडणार आहे.

जिल्ह्यात गेल्या दोन महिन्यांपासून १४ ग्रामीण रुग्णालये व ८ मनपाच्या रुग्णालयांत कोरोना लसीकरण सुरू झाले असून त्यात आरोग्य, महसूल, पोलीस कर्मचाऱ्यांना लस दिली जात आहे. १ मार्चपासून ६० वर्षांवरील नागरिक व ४५ वर्षांवरील व्याधीग्रस्त नागरिकांना लस देण्यास प्रारंभ करण्यात आला. शासकीय रुग्णालयांत ही लस मोफत तर खासगी रुग्णालयांत २५० रुपयांना मिळत आहे.

लसीकरणास वाढता प्रतिसाद लक्षात घेता आता जिल्ह्यातील ९६ प्राथमिक आरोग्य केंद्रांतही लसीकरण सुरू करण्याची तयारी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने केली आहे. सोमवारपासून या केंद्रांवर लसीकरण होणार आहे. दुर्गम भागातील केंद्रावर इंटरनेटची सुविधा नसल्याने तेथे लसीकरणास काही अडचणी येतील. मात्र, उर्वरित बहुतांश केंद्रांवर सोमवारपासून लसीकरण सुरू होणार आहे. आठवड्यातून सोमवार, बुधवार व शुक्रवार असे तीन दिवस हे लसीकरण सुरू राहील.

### चार दिवसांत अडीच हजार जणांचे लसीकरण

१ मार्चपासून कोरोना लसीकरण मोहीम सुरु झाल्यानंतर गेल्या चार दिवसांत १४ ग्रामीण रुग्णालयांत अडिच हजार नागरिकांनी लस घेतली आहे. यात ६० वर्षांवरील २१०१, तर ४५ वर्षांवरील ३९५ नागरिकांचा समावेश आहे. यापैकी शुक्रवारी दिवसभरात ११०० जणांनी लस घेतली.

लोकमत

# पिचकारी बहाद्दरांना ७१ हजारांचा दंड

## जिल्हाभर कारवाई : मास्क न लावणाऱ्या १५ हजार जणांवर कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**अहमदनगर** : जिल्ह्यात सार्वजनिक ठिकाणी थुंकणाऱ्या ४६० जणांवर पोलिसांनी दंडात्मक कारवाई करत ७१ हजार २०० रुपयांचा दंड ठोठावला आहे. मास्क न घालणे तसेच फिजिकल डिस्टन्सिंगचे पालन न करणाऱ्यांवरही कडक कारवाई हाती घेण्यात आली आहे.

### १४ दिवसांत अशी झाली कारवाई

**विनामास्क-** १४ हजार ५८० केस-१९ लाख ४२ हजार १०० रुपय दंड.

**फिजिकल डिस्टन्सिंग न पाळणे-** ३२५ केस- ४० हजार ५०० रुपयांचा दंड.

**सार्वजनिक ठिकाणी थुंकणे-** ४६० केस- ७१ हजार २०० रुपये दंड.

खासगी, शासकीय आस्थापनांसाठी ३०९ पथकांची नियुक्ती.

नियम पाळण्याबाबत ७४८ आस्थापनांना नोटीस जारी.

जिल्ह्यात १९ जानेवारी ते ४ मार्चपर्यंत मास्क न घालणे, सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, फिजिकल डिस्टन्सिंगचे पालने न करणे अशा एकूण १५ हजार ३६५ जणांवर पोलिसांनी कारवाई करत २० लाख ५३ हजार ८०० रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने नियम लागू करत त्यांची कडक अंमलबजावणी सुरू केली आहे.

नियमभंग करणाऱ्यांना सुरुवातील २०० रुपये दंड करण्यात येत होता. आता ५०० रुपये दंड आकारला जात आहे. त्यामुळे नागरिक आता घराबाहेर पडताच तोंडाल मास्क लावताना दिसत आहेत. नगर शहरात गुरुवारी चौकाचौकात पथकांची नेमणूक करून नियम तोडणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे.

रात्री अत्यावश्यक सेवा वगळता इतरांना फिरण्यास बंदी आहे. संचारबंदीच्या अंमलबजावणीसाठी पोलिसांनी रात्रीची गस्त वाढविल्याने शहरात रात्री दहानंतर शांतता असते.

लोकमत

## तिघांचा मृत्यू : दिवसभरात ३०० चा टप्पा ओलांडला

# सावधान, कोरोना वाढतोय

लोकमत न्यूज नेटवर्क

**अहमदनगर :** जिल्ह्यात कोरोनाचा संसर्ग वाढण्यास सुरुवात झाली असून, शुक्रवारी तब्बल ३०३ नवे रुग्ण आढळले. गेल्या पाच महिन्यांत पहिल्यांदाच रुग्णसंख्या तीनशेच्या पुढे गेली आहे. दरम्यान, दिवसभरात तिघांचा मृत्यूही झाला.

दरम्यान, शुक्रवारी दिवसभरात १८६ रुग्णांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. आता बरे झालेल्या रुग्णांची एकूण संख्या ७४ हजार ५६४ इतकी झाली आहे. रुग्ण बरे होण्याचे जिल्ह्यातील प्रमाण हे आता ९६.७० टक्के आहे. सध्या उपचार सुरू असणाऱ्या रुग्णांची संख्या आता १,३९४ इतकी झाली आहे.

जिल्हा रुग्णालयाच्या कोरोना टेस्ट लॅबमध्ये १७४, खासगी प्रयोगशाळेत केलेल्या तपासणीत ११८ आणि अँटिजन चाचणीत ११ रुग्ण बाधित आढळले.




जिल्हा रुग्णालयाच्या कोरोना टेस्ट लॅबमध्ये बाधित आढळून आलेल्या रुग्णामध्ये मनपा ८४, अकोले १९, जामखेड ६, कर्जत २, नगर ग्रामीण ३, नेवासा १, पारनेर १, पाथर्डी ९, राहुरी ५, संगमनेर ३०, श्रीगोंदा ४, कॅन्टोन्मेंट बोर्ड १०, अशा रुग्णांचा समावेश आहे.

खासगी प्रयोगशाळेत केलेल्या तपासणीत बाधित आढळून आलेल्या रुग्णांमध्ये मनपा २३, अकोले ३, कर्जत ३, कोपरगाव ७, नगर ग्रामीण ८, नेवासा ७, पारनेर २, पाथर्डी २, राहाता १५, राहुरी ९, संगमनेर २१, शेवगाव १, श्रीरामपूर १२ आणि इतर जिल्हा ५, अशा रुग्णांचा समावेश आहे.

अँटिजन चाचणीत आज ११ जण बाधित आढळून आले. नगर ग्रामीण २, पारनेर १, राहाता ४, संगमनेर २, शेवगाव १, श्रीरामपूर १, अशा रुग्णांचा समावेश आहे.

दरम्यान, डिस्चार्ज मिळालेल्या रुग्णांमध्ये मनपा ७१, अकोले २, जामखेड १, कर्जत १, कोपरगाव ३, नगर ग्रामीण ५, नेवासा १, पारनेर १६, पाथर्डी ७, राहाता १४, राहुरी ५, संगमनेर ४८, शेवगाव २, श्रीगोंदा २, श्रीरामपूर ४ आणि इतर जिल्हा ४, अशा रुग्णांचा समावेश आहे.

लोकमत

# शेवगावला दुसऱ्या टप्प्यातील अतिवृष्टीचे अनुदान वाटप

लोकमत न्यूज नेटवर्क

**शेवगाव :** तालुक्यातील अतिवृष्टीमुळे होरपळलेल्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर महसूल विभागाने दुसऱ्या टप्प्यातील अनुदान वर्ग केले असून, पुढील आठवड्यात अनुदानाची रक्कम काढता येणार आहे, अशी माहिती तहसीलदार अर्चना पागिरे यांनी दिली आहे.

मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टी व मुसळधार पावसामुळे खरीप व रब्बी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते.

यावेळी प्रशासनाने तत्काळ नुकसानग्रस्त भागाचे पंचनामे करून शासनाकडे नुकसानाबाबतचा अहवाल पाठवला होता. त्यानुसार शासनाने शेतकऱ्यांना मदत देऊ केली. पहिल्या टप्प्यात ५५ गावांना अनुदानाची रक्कम वाटप करण्यात आली.

तालुक्यात ४१ हजार हेक्टर क्षेत्रातील पिकं बाधित झाले होते, त्यासाठी एकूण ४२ कोटी ४६ लाख अनुदान प्राप्त झाले. सदर अनुदानाची रक्कम १११ गावातील ५४ हजार ५४८ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली.

अद्याप दोन गावे बाकी असून, तेथे १ कोटी १० लाख अनुदान लवकरच देण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात २४ कोटी २३ लाख अनुदान प्राप्त झाले होते ते ५५ गावातील २३ हजार ८०२ हेक्टर क्षेत्र बाधित झाल्याने ३० हजार ७८६ शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर २३ कोटी ७१ लाख रुपये पूर्वीच वर्ग करण्यात आले आहे.

गत महिन्यात दुसऱ्या टप्प्यातील २४ कोटी २३ लाख रुपये अनुदान प्राप्त झाले होते. हे अनुदान ५६ गावातील २३ हजार ७६२ शेतकऱ्यांना १७ हजार २०५ बाधित हेक्टर क्षेत्रासाठी १९ कोटी ६५ लाख रुपयांचे धनादेश बँकेकडे सुपुर्द केले असून, लवकरच ते शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा होणार आहेत.

२०२० मध्ये तालुक्याच्या काही भागात अवकाळी पावसाने नुकसान झाले. अशा १५ गावच्या मदतीसाठी ३३ लाख रुपये मदत प्राप्त झाली आहे. ही मदत वितरीत करण्यासाठी याद्या तयार करण्याचे काम सुरू आहे.

लोकमत

### रोहयोतून होणार कामे : मंजुरीचे अधिकार जिल्हा परिषदेकडून पुन्हा पंचायत समितीकडे

# सिंचन विहिरींचे १२१ प्रस्ताव प्रलंबित

लोकमत न्यूज नेटवर्क

**अहमदनगर :** रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून सिंचन विहिरींची कामे केली जातात. परंतु, वर्षभरात या योजनेचे १२१ प्रस्ताव प्रलंबित आहेत. दरम्यान, आता या योजनेच्या मंजुरीचे अधिकार जिल्हा परिषदेकडून पुन्हा पंचायत समितीकडे गेले आहेत.

जिल्ह्यात सिंचनाचे क्षेत्र वाढावे, म्हणून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून अल्पभूधारक, अल्पसंख्याक लाभार्थ्यांना सिंचन विहीर मंजूर केली जाते. २०१२ पासून ही योजना सुरू झाल्यानंतर प्रस्तावास अंतिम मंजुरी देण्याचे अधिकार पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे होते. परंतु, पुढे नोव्हेंबर २०१८ पासून या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार गटविकास अधिकाऱ्यांकडून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे देण्यात आले. आता ४ मार्च २०२१ पासून प्रशासकीय मंजुरीचे अधिकार पुन्हा गटविकास अधिकाऱ्यांकडे देण्यात आले आहेत.

## तालुकानिहाय प्रलंबित प्रस्ताव

| | |
|---|---|
| अकोले | ५ |
| जामखेड | ७ |
| कर्जत | २ |
| कोपरगाव | २२ |
| नगर | ८ |
| नेवासा | ४ |
| पारनेर | २४ |
| पाथर्डी | १५ |
| राहता | ३ |
| राहुरी | ७ |
| संगमनेर | १० |
| शेवगाव | ४ |
| श्रीगोंदा | ७ |
| श्रीरामपूर | ३ |

**एकूण - १२१**

## कोपरगाव तालुक्यातील सर्वाधिक २२ प्रस्ताव



जिल्ह्यातील सर्वाधिक २२ प्रस्ताव कोपरगाव तालुक्यातील प्रलंबित असून सर्वात कमी दोन प्रस्ताव कर्जत तालुक्यातील आहेत.

- विहिरींसाठी आलेले प्रस्ताव - ७४९
- मंजूर प्रस्ताव - ६२८
- मंजुरीच्या प्रतीक्षेतील प्रस्ताव - १२१

दरम्यान, जिल्हा परिषदेच्या रोजगार हमी विभागात गेल्या दोन वर्षांत एकूण ७४१ प्रस्ताव विहिरींसाठी दाखल झाले. त्यातील ६२८ प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली, तर १२१ प्रस्ताव त्रुटी असल्याने प्रलंबित होते. पैकी ४२ प्रस्ताव त्रुटी पूर्तता होऊन आले असून ते जिल्हा परिषदेत कृषी विभाग, तसेच मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे मंजुरीसाठी आहेत. उर्वरित ७९ प्रस्तावांतील त्रुटींची अद्याप पूर्तता झालेली नसल्याने ते प्रलंबित आहेत.

# शिक्षकांच्या ५८०० जागा भरतीस पुढील महिन्यात मान्यता

## शिक्षण उपसंचालकांची माहिती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नगर :** सध्या शाळाबाह्य विद्यार्थ्यांच्या सर्वेक्षणाचा प्रश्न महत्त्वाचा असून करोनाच्या पार्श्वभूमीवर शिक्षण संचालकांची परवानगी घेऊन सर्वेक्षण पुढे ढकलण्याचा प्रयत्न करु, तसेच पवित्र प्रणालीमार्फत ज्या शाळांनी यापूर्वी शिक्षकांसाठी प्रस्ताव दाखल केले आहेत, त्यांना एप्रिल २०२१ शिक्षक भारतीला परवानगी दिली जाईल, राज्यात सुमारे ५ हजार ८०० रिक्त जागांवर शिक्षक भरती होईल. तसेच नगर जिल्ह्यातील सर्व विनाअनुदानित उच्च माध्यमिक शिक्षक शिक्षकेतर मान्यतेची शिबिरेही आयोजिण्यात येतील, अशी माहिती पुणे विभागाचे शिक्षण उपसंचालक औदुंबर उकिरडे यांनी दिली.

पुणे विभागाच्या शिक्षण उपसंचालकपदी औदुंबर उकिरडे यांची नियुक्ती झाल्याबद्दल नगर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्या वतीने जिल्हाध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी उकिरडे बोलत होते. सहायक शिक्षण उपसंचालक मीना सेंडकर, शिक्षणाधिकारी रामदास हराळ, उपशिक्षणाधिकारी शिवाजी शिंदे, वरिष्ठ सहायक अरविंद मोरे, शिक्षण उपनिरीक्षक सुनील वाळके, मुख्याध्यापक संघाचे राजेंद्र वाघ, प्राचार्य अशोक दोडके, प्राचार्य चंद्रकांत चौगुले, कैलास साठे, ज्ञानदेव बेरड, बाबासाहेब शिंदे, प्राचार्या कांचन गावडे, सुनिता पालवे आदी उपस्थित होते.



पुणे विभाग शिक्षण उपसंचालकपदी औदुंबर उकिरडे यांची नियुक्ती झाल्याबद्दल जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या वतीने जिल्हाध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित यांनी त्यांच्या हस्ते सत्कार केला.

जिल्ह्यातील मुख्याध्यापक व शिक्षकांच्या सहभागातून शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी उपक्रम राबवण्याची सूचनाही त्यांनी केली.

सुनील पंडित यांनी शिक्षकांच्या प्रश्नांकडे त्यांचे लक्ष वेधले. करोनाचा संसर्ग पुन्हा वाढल्याने तसेच शिक्षकांना सध्या करोना प्रतिबंधक सूचनांचे पालन करून शाळेत अध्यापनाचे काम करावे लागते. १० वी १२ वी विद्यार्थ्यांच्या सराव प्रात्यक्षिक परीक्षेचे काम प्राधान्याने करावे लागत असल्यामुळे शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे सर्वेक्षणास तूर्त स्थगिती मिळावी, पवित्र प्रणालीचे काम अनेक दिवसांपासून बंद आहे, शाळेमध्ये अनेक विषयाला शिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होते, विनाअनुदानित शाळांच्या प्रश्नांचे कँप लावावेत, शाळांना संच मान्यतेची प्रत मिळाली नाही आदी प्रश्न त्यांनी मांडले.

# सामान्यांना लस मिळणे सुलभ होणार

## सोमवारपासून ग्रामीण भागात लसीकरण; शासकीय रुग्णालयात लस मोफत मिळणार

**नगर, दि. ५-** करोनाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने प्रतिबंधक उपाययोजना सुरू केल्या आहेत. करोना लस आता ठराविक वयोगटातील व्यक्तींना शासकीय रुग्णालयांमध्ये सोमवारपासून मोफत मिळणार आहे. जिल्हा आरोग्य विभागाकडे कोविड लस पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे. लसीकरण मोहीम व्यापक करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने नियोजन केले आहे.

### • येथे लस उपलब्ध

दोन उपजिल्हा रुग्णये, तेवीस ग्रामीण रुग्णालयांमध्ये सोमवार ते शनिवार लस उपलब्ध असणार आहे. ९६ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये सोमवार, बुधवार, शुक्रवारी लसीकरणाचे नियोजन केले आहे. तर, नगर शहरात जिल्हा रुग्णालय, खासगी रुग्णालये व महापालिकेच्या केंद्रावर लस उपलब्ध आहे.

जिल्ह्यात करोनाची दुसरी लाट येण्याची शक्यता वर्तविली जात असून, दिवसेंदिवस करोनाचे रुग्ण वाढत आहे. जिल्ह्यात सरासरी दररोज दोनशे रुग्ण आढळून येत आहेत. जिल्हा रुग्णालय, महानगरपालिका हद्दीत कोविड लस देण्याची प्रक्रिया सुरू आहे. तर, जिल्ह्यात ३१ खासगी रुग्णालयात लस उपलब्ध झाली असून तिथे नागरिक लस घेऊ शकतात.

जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालयात तत्काळ लस उपलब्ध होण्यासाठी जिल्हा परिषद आरोग्य विभागाने तातडीची पाऊले उचली आहेत. जिल्ह्यातील उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय आणि प्राथमिक आरोग्य केंद्रात लस उपलब्ध होणार आहे. साठ वर्ष पूर्ण असलेल्या व्यक्तीने लस घेण्यासाठी लसीकरण केंद्रावर जावे आणि जाताना आधारकार्ड बरोबर ठेवणे आवश्यक आहे. लस घेणारी व्यक्ती कोविन ॲपवर नोंदणी करू शकते किंवा लसीकरण केंद्रावर गेल्यानंतर तिथेही नोंदणी करता येईल. त्यासाठी मोबाइल (ओटीपीसाठी) आवश्यक आहे. एका मोबाईलवरून चार व्यक्ती नोंदणी करू शकतात. ४५ ते ५९ वय असणाऱ्यांना व्यक्तींनाही लस दिली जाणार आहे. उच्च रक्तदाब, किडनी विकार, मधुमेह असा आजार असल्यास संबंधित व्यक्तीने वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. त्यामुळे संबंधित व्यक्तीने ते प्रमाणपत्र उपलब्ध करणे गरजेचे आहे.

लसीकरण मोहीम व्यापक करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांना आज प्रशिक्षण देण्यात आले आहे, अशी माहिती सूत्रांकडून समजली.

> आरोग्य विभागाकडे पुरेशाप्रमाणात कोविड डोस उपलब्ध असून, नागरिकांनी ॲपवर तत्काळ नोंदणी करून लस घ्यावी. नोंदणी नसल्यास लसीकरण केंद्रावर जाऊन नोंदणी करावी.
>
> **– डॉ. संदीप सांगळे,**
> जिल्हा आरोग्य अधिकारी.

पुण्यनगरी

# 'सप्तपदी'ने केले तब्बल तीनशे शेत-पाणंद रस्ते खुले !

## 'वावरा'ला दिलासा : १ हजार २३३ तुकडे नियमित : ४ कोटींचा महसूल जमा

**अहमदनगर :** जिल्हाधिकारी डॉ.राजेंद्र भोसले यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात 'महसूल विजय सप्तपदी अभियान' हाती घेण्यात आले आहे. मागील जवळपास तीस दिवसांच्या अवधीत 'सप्तपदी'द्वारे जिल्हाभारातील तब्बल ३०० शेत पाणंद रस्ते महसूल अधिकाऱ्यांच्या पुढाकारात सामोपचाराने मोकळे झाले. तसेच १ हजार २३३ तुकडे नियमितीकरणाच्या प्रकरणी कारवाई करीत तब्बल चार कोटींचा महसूल जमा झाला. एकूणच या पथदर्शी प्रयोगाने 'वावरा'ला दिलासा मिळत असल्याचे चित्र प्रत्ययास येत आहे.

मुखत्वे शेतजमिनी विषयक समस्या सोडविण्यासाठी जिल्ह्यात महसूल विजय सप्तपदी अभियान हाती घेण्यात आले आहे. चार फेब्रुवारी रोजी या अभियानाची घोषणा जिल्हाधिकारी डॉ.भोसले यांनी केली. महसूल विजय सप्तपदी अभियानात जमीन विषयक कामे जलदगतीने करतानाच नागरिकांसाठी दिलासादायक ठरतील अशा बाबींचा समावेश करण्यात आला आहे. या अभियानाच्या अंमलबजावणी प्रत्येक तालुक्यासाठी उपजिल्हाधिकारी यांच्याकडे समन्वय अर्थात नोडल अधिकारी म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली आहे. रस्त्यातील अतिक्रमणांवर कारवाई करणे, प्रत्येक गावात स्मशानभुमीसाठी जागा उपलब्ध करून देणे, पोट खराबा असलेल्या जमिनींचे सर्वेक्षण करून या जमिनी लागवडीखाली येण्यासाठी प्रयत्न करणे, महाआवास योजनेतून घरकुलासाठी जागा उपलब्ध करून देणे, पानंद आणि शेत रस्ते खुले करणे, खंडकऱ्यांना जमिनी मिळवून देणे, आदी कामे मुख्यत्वे या योजनेतून करण्यात येत आहेत. घोषणेनंतर दि.७ फेब्रुवारीपासून जिल्हाभरात सप्तपदीची अंमलबजावणी सुरु झाली. प्रत्येक महसूल मंडळात तहसीलदार व प्राधिकारी यांच्या प्रबोधनातून सप्तपदीचा जागर सुरु झाला. अनेक शेत व पाणंद रस्ते वर्षानुवर्ष विवादाच्या फेऱ्यात अडकून पडले आहेत. वादाच्या अडथळ्यामुळे वावरायला मर्यादा पडणे सहाजिकच आहे. सप्तपदीने मागील तीस दिवसांच्या काळात शेत पाणंद रस्त्यांच्या श्वास मोकळा करण्याची कामगिरी झाली. याकामी तहसीलदार, उपविभागीय अधिकारी व महसूल कर्मचारी वर्गाने सुसंवाद स्थापित करीत बजावलेली भूमिका दखलपात्र ठरली. जिल्ह्यातील ३०० शेतपाणंद रस्ते खुले झाले. तसेच तसेच १ हजार २३३ तुकडे नियमितीकरणाच्या प्रकरणी कारवाई करीत तब्बल चार कोटींचा महसूल जमा झाला आहे. सप्तपदी अंतर्गत जिल्ह्यातील सहा गावांना स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली. जिल्हाधिकारी यांच्या निर्देशात निवासी उपजिल्हाधिकारी संदीप निचित ₹सप्तपदी'चा समन्वय राखीत आहेत.अभियान पुढील काळातही सुरु राहाणार आहे.

### शिवाराची नड सोडवणे हा हेतू : डॉ. भोसले

याबाबत 'सप्तपदी'चे जनक जिल्हाधिकारी डॉ.भोसले यांच्याशी पुण्यनगरी प्रतिनिधीने संपर्क साधला असता ते म्हणाले, छोट्या गोष्टींसाठी लोक वर्षानुवर्षं नडलेले आहेत. त्यावर समन्वय व परस्पर संवादाने मात करता येवू शकते. हाच विश्वास ठेवून सप्तपदी कार्यान्वित केली आहे. शिवाराची नड सोडवणे हाच 'सप्तपदी'चा हेतू आहे.